Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P054
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# भारतीय समाजप्रबोधनाचा नजिकच्या भूतकाळातील प्रभावी प्रकार 'खडीगंमत'

**संशोधनकर्ता**
**प्रकाश नामदेवराव वाहणे**
समाजशास्त्र विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ नागपूर

**सारांश :**

भारतीय समाजप्रबोधनाची परंपरा प्राचिन काळापासून अस्तित्वात असल्याचे आपणास दिसून येते. यामध्ये समाजसुधारक, साहित्य, संतपरंपरा लोकसंस्कृतीचे उपासक इ. माध्यमांनी प्रामाणिकपणे समाजप्रबोधनाचे व मनोरंजनाचे कार्य केले आहे. समाजप्रबोधन व मनोरंजनाच्या अंगाने भारतातील लोकनाट्य, लोककला या प्रकारांनी समाजप्रबोधनाचे काम मनापासून पार पाडले आहे.

भारतीय रंजनपर लोकनाट्याचा विचार करतांना लोकरंभूमीचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. भारतीय प्रांतातील रंगभूमी असो वा जागतिक असो, त्या एकाच सांस्कृतिक व्यूहातील रंगभूमी आहेत असे दिसून येते. विविध सांस्कृतिक परंपरानी नटलेल्या भारतात चित्रकला, नृत्यकला, शिल्पकला, वाङ्मयकला, लोककला इत्यादी कला जोपासल्या जातात. म्हणून भारत देश सांस्कृतिक दृष्ट्या अव्वल स्थानी आहे. प्राचिन काळापासून भारतातील गावखेड्यात विविध प्रकारच्या कला अस्तित्वात आल्या. प्राथमिक गरजा पूर्ण झाल्यावर मानव मनोरंजनाकडे वळतो. मनोरंजनाची भुक भागविण्यासाठी मानवाने नृत्य-नाट्य व गायनाची प्रथा सुरु केली. यातून भारतातील विविध प्रदेशात वेगवेगळ्या लोककला निर्माण झाल्या.

खडीगंमत या लोकनाट्याला महाराष्ट्रात 'तमाशा' असे नामाभिधान आहे. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशातील रंजननाट्यप्रकार नौटंकी, गुजरात मधील भवाई, ख्याल, मध्यप्रदेशातील लोकप्रिय नाट्यप्रकार 'माच' आंध्रातील 'बुर्राकथा' व मुखवट्याचे 'छाऊ' नृत्य, मद्रासचे लोकप्रिय नाट्य 'तिरुकुथू' तर उत्तर प्रदेशातील एक रंजकनाट्यप्रकार 'नौटंकी' इत्यादी लोकरंजनपर नाट्ये आहेत. ही सगळी रूपे महाराष्ट्रातील 'तमाशा' किंवा 'खडीगंमत' च्या मुळ रूपाला (गाभ्याला) कायम ठेऊन आविष्कृत झाली आहेत असे म्हणता येते.

केवळ प्रेक्षकांच्या अभिरूचीप्रमाणे व प्रदेशापरत्वे त्यांची रूपे विकसित झाली पण आकृतिबंध आणि त्याचे स्थूलरूप सर्वत्र सारखेच असतात.

साधारणतः पूर्वविदर्भ, मध्यप्रदेशातील व छत्तीसगड मधील काही परिसरात 'खडीगंमत' या लोकनाट्याचा बराच प्रभाव दिसून येतो. विदर्भातील नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा इ. जिल्ह्यातील खेडे विभागात या लोकनाट्याची परंपरा मागील काही दशकांपासून आजतागायत प्रकर्षाने दिसून येते. मनोरंजनासोबत जनप्रबोधनाचे कार्य करीत असते. परंतु अलिकडे आधुनिक प्रचार माध्यमांमुळे ही लोककला हळूहळू लोप पावत असल्याचे दिसून येते.

**बिजशब्द :** समाजप्रबोधन, खडीगंमत, नजिकचा भूतकाळ

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रात संतांची परंपरा सुरु होण्यापूर्वीच लोकनाट्याचा उदय झाला होता. लोकांनीच लोकनाट्य निर्माण केले होते. प्राचिन धर्मग्रंथात, रामायण व महाभारतात विदर्भाचा उल्लेख दिसून येतो. एवढेच नाही तर आर्यांची दक्षिणेकडील पहिली वसाहत विदर्भच होती हे दिसून येते. महाराष्ट्रात तमाशा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकनाट्याला विदर्भात 'खडीगंमत' किंवा 'गंमत' म्हणून ओळखले जाते. हे लोकनाट्य विविध पात्रांच्या सादरिकरणातून समाजप्रबोधन व लोकरंजनाचे महत्कार्य करित लोकभाषेतून धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक परंपरा टिकवून ठेवत आहे. खडीगंमतमध्ये एकाच फडाचे सादरीकरण होत असते. फड हा 'कलगी' वा 'तुर्रा' पक्षाचा असू शकतो परंतू अलिकडे, सुभान पार्टी, तिरंगा निशान, पिवळे निशान, निळे निशान इत्यादी पक्ष व वेगवेगळे निशानही आपापल्या परंपरेप्रमाणे खडीगंमत सादर करतात.

दोन पक्षांतील (घराण्यातील) खडीगंमतचा सवाल-जबाब म्हणजे 'दुय्यमची गंमत' आद्यात्मिक प्रश्नोत्तराचा खेळ दुय्यम खडीगंमत मध्ये रंगत असतो.

**खडीगंमतीचे सादरिकरण :**

नृत्य, अभिनय, संगीत, गीत व खटकेबाज संवादामुळे नाट्य निर्माण करणारी खडीगंमत दोन भागात विभागली जाते. एक पूर्वरंग व दुसरा उत्तररंग. पूर्वरंगात गण व गवळण सादरिकरण होते तर उत्तररंगात प्रामुख्याने लावणी, वग, पोवाडा, मूजरा व शेवटी सूर्यनमस्कार सादर होऊन खडीगंमत प्रेक्षकगणांचा निरोप घेऊन आपला गाशा गुंडाळते.

**खडीगंमतीतून मनोरंजन व सामाजिक प्रबोधन :**

उत्तररंगात अर्थात गवळणीनंतर बहूदा लावणी सादर होत असते. लावण्यांच्या विविध प्रकारच्या बतावणीतून प्रेक्षकांचे रंजन व सामाजिक प्रबोधन होत असते. खंडीगंमतीचे मुख्य आकर्षण पोरसवदा वयाचा तरुण आकर्षक मुलगा 'नाच्या' असतो तर सुत्रधार शाहिर असतो. अशा प्रकारे शाहिर, सहशाहिर यांच्या बरोबर नाच्या आणि गमत्या प्रामुख्याने लावणी व इतर प्रासंगिक नाट्यातून प्रेक्षकांचे समाधान करण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. यात प्रामुख्याने पुराणातील प्रश्न-उत्तरे, तत्वज्ञानावर सवाल-जवाब यातून विविध अविष्कार घडविले जातात. एखाद्या पौराणिक विषयावरील कथानक पद्यात्मकरित्या उत्तर रंगात सादर केले जाते. किंबहुना चरित्राख्यान सुद्धा पोवाड्यातून सादर केले जातात.

प्रबोधन व जनजागृती कंटाळवाणी होऊ नये म्हणून गमत्याची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण असते. गमत्या आपल्या मुक्त अभिनयाने शेवटपर्यंत प्रेक्षकांना हसवित ठेवतो. खडीगंमतची यशस्वीता गमत्यावरच अवलंबून असते. तो शब्दांचा विपर्यास करुन व द्विअर्थी शब्दप्रयोग करुन प्रेक्षकांना हसविण्याचे काम करतो. म्हणून त्याला 'तमाशाचे गुणी बाळ' म्हटले असले तरी तमाशाचा फड शाहिरांच्याच नावानेच चालतो.

शाहिर, सहशाहिर, नाच्या, गमत्या, वादयवृंद यांच्या संयुक्तिक मेहणतीने सादर होणाऱ्या लोककलेत अलिकडील भूतकाळापासून सामाजिक, राष्ट्रिय, शैक्षणिक विषय हाताळले जावू लागले आहेत.

**खडीगंमतीतून सामाजिक समस्येवर भाष्य :**

आधुनिक काळात मात्र समाजातील विविध समस्यांवर आधारित खडीगंमत सादर केली जाते. हुंडा पद्धत, सासुरवास, सावत्र आई, अंधश्रद्धा निर्मुलन, मोबाईल वापराचे दुष्परिणाम कौटुंबिक समस्या, हागणदारी मुक्त गाव अशा वेगवेगळ्या सामाजिक समस्येशी निगडीत 'खडीगंमत' सादर केली जाते.

**खडीगंमतीचे राष्ट्रीय योगदान :**

शिवाजी महाराजावर व त्याच्या जीवनकार्यावर मुबलक पोवाड्याची निर्मिती करणारे शाहिर अशिक्षित, अर्धशिक्षित असूनही त्यांनी अप्रतिम काव्य निर्मिती केली आहे. ठिकठिकाणी वगनाट्ये, पोवाडे, लोकनाट्यातून सादर करुन सामाजिक प्रबोधन केले. शिवाजी महाराजाच्या निधनानंतर तिनशे वर्षांनी शिवाजींच्या कार्यकर्तृत्वाला अभिवादन करण्याकरिता महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांनी छत्रपती शिवाजींचा पोवाडा रचला. तीच परंपरा आजही पोवाड्याच्या माध्यमांतून सुरु असल्याचे दिसून येते. खडीगंमत या लोकनाट्यातील पोवाडा हा कला प्रकार (कथन नाट्य) खडीगंमतीचे अभिन्न अंग समजले जाते.

**खडीगंमतीचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान :**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातही पोवाडा या लोकनाट्य प्रकाराने अनेक क्रांतीकारक निर्माण केले. समाजाच्या सर्वच स्तरातील लोक प्रभावित होऊन ब्रिटीशांविरुद्धच्या लढ्यात त्वेषाने उतरले. परिणामी भारताला स्वातंत्र्य मिळाले.

अलिकडील भूतकाळाप्रमाणे आजही असंख्य गावातून हा लोकनाट्याचा प्रकार समाजमन चेतविण्याचे महान कार्य करुन सामाजिक उद्बोधन व मनोरंजन करत आहे. आजही खडीगंतीतील पोवाड्याचा प्रभाव लोकमानसात कमी-अधिक प्रमाणात दिसून येतो.

**लगतच्या भूतकाळातील खडीगंमतचा प्रभाव**

भारतीय स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळखंडाचा विचार केला तर, मनोरंजनाची व समाजप्रबोधनाची साधने लोकांजवळ उपलब्ध नव्हती तेव्हा खडीगंमतीचा लोकमानसावर प्रचंड प्रभाव होता. या लोकनाट्याने सामाजिक विषय हाताळून समाजमन जागृत करण्याचे काम खडीगंमतीतील लोककलावंतानी केले. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील खडीगंमत या लोकनाट्याचे मौलिक योगदान लाभले आहे. म्हणून तुमसर येथे झालेल्या खडीगंमतच्या सोहळ्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी 'राष्ट्रीय खडीगंमत' असा शब्दप्रयोग करुन या लोकनाट्याचा गौरव केला होता.

तत्कालीन नावाजलेल्या खडीगंमतच्या शाहिरांचे सामाजिक योगदान वाखाणन्याजोगे होते. शाहिर परशराम, शाहिर कनैहया, शाहिर गरिबा, शाहिर अंबादास नागदेवे, सदाशिव लक्ष्मण अशा असंख्य शाहिराचे फड विदर्भात होते. त्यातील अनेक शाहिरांनी आजही वृद्धावस्थेत या सामाजिक प्रबोधनाचा व लोकनाट्याचा नाद सोडला नाही. कारण ही कलावंत मंडळी पैशासाठी हपापली नव्हती तर त्यांना सामाजिक प्रबोधनाची व लोककलेची परंपरा जतन करायची होती.

**खडीगंमतचे आधुनिक विषय :**

अलिकडील शाहिर, खडीगंमत या लोकनाट्यातून कुटुंबकल्याण, प्रदुषण, सामाजिक प्रबोधन, स्वैराचार, व्यसनाधिनता त्याचप्रमाणे अनेक कल्याणकारी सरकारी योजनांचा प्रचार व प्रसार आपल्या खडीगंमतीच्या प्रयोगातून करित आहेत. त्यामुळे अशिक्षित, अडानी जनतेचे उद्बोधन होत होते. अशा प्रकारे

लोकजागृतीचे कार्य या खडीगंमतीच्या शाहिरांनी वग, लावणी, पोवाडा इ. काव्यप्रकारातून सामाजिक कवन करुन लोकरंजनाचे व लोकशिक्षणाचे कार्य केले.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तूत संशोधन अन्वेषणात्मक व गुणात्मक अध्ययन दुय्यम स्त्रोतांद्वारे आणि अनेक संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख, प्रत्यक्ष मुलाखत, खडीगंमतचे प्रात्यक्षिक इ. माध्यमांचा उपयोग करुन माहिती संकलित केली आहे.

**अध्ययनाचा उद्देश :**

१) लोकनाट्य/लोककलांचे अध्ययन करणे.
२) लोकसंस्कृतीतील बदलांचे अध्ययन करणे
३) लोकनाट्य खडीगंमतच्या सादरीकरणातील बदलांचे अध्ययन करणे
४) अलिकडे लोकनाट्य हे प्रकार अस्तंगत होण्याची कारणे व त्यावरील उपाय सुचविणे

**चर्चा :**

प्राचिन काळापासून खडीगंमत हा लोकनाट्यप्रकार काळापरत्वे कमी-अधिक बदलून आजही अस्तित्वात आहे. परंतू आधुनिक काळातील मनोरंजनाची साधने, दुरदर्शन संच निरनिराळी प्रचार माध्यमे, शहरीकरण, औद्योगिकीकरण, सांस्कृतिकीकरण, इत्यादी गोष्टीमुळे सामाजिक वातावरण बदलले आहे. प्रत्येकाच्या घरात दुरदर्शन संच असल्यामुळे सामुहिकता आणि सामाजिकता लोप पावली आहे.

एकलकोंडेपणा निर्माण झाल्यामुळे एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होण्याची परंपराच नष्ट झाली. शिवाय खडीगंमत सारख्या लोकरंजनपर कार्यक्रमात लोकांना रूची वाटणे दुर्लभ झाले आहे. दुरदर्शन संचावरील कार्यक्रम सोडून लोकनाट्य पाहायला जाणे लोकांना नकोसे झाले आहे. लोकांच्या गरजाही मोठया प्रमाणात वाढल्या असल्यामुळे कलावंतांनाही मोबदल्याच्या रूपात मिळकत मिळायला हवी आहे. ती ग्रामीण जनतेकडून मिळणे शक्य नाही.

याव्यतिरिक्त आजच्या लोकनाट्यातही प्रचलित असलेल्या सिनेसंगिताने प्रवेश केला असल्यामुळे या लोकनाट्याचा पूर्वीचा दर्जा खालावलेला आहे. दुरदर्शन संचात दिसणाऱ्या फॅशनच्या या दुनियेत पारंपारिक वेशभुषेतील लोककलावंत मंडळी आणि त्यांची कलेची साधने उपहासात्मक झालेली दिसतात. हे या लोकनाट्याचा अध्ययनातून दिसते. पारंपारिक लोकनाट्य प्रकार या परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळे धोक्यात आले आहेत. तरी देखील खडीगंमत हे लोकनाट्य आपल्या लोककलेत काही परिवर्तनं स्विकारुन लोकरंजन व समाजप्रबोधन तेवढ्याच उत्साहाने करित आहे. असे असूनही हे लोकनाट्य दिवसेंदिवस लोप पावत आहे; तर काही लोककला नामशेष झाल्या आहेत.

या पारंपारिक लोककला, आपली समृद्ध लोकसंस्कृती व लोकरहाटीचे अस्तीत्व टिकवून ठेवण्यासाठी या अध्ययनाची गरज आहे ही जाणिव संशोधक म्हणून निर्माण झाली.

प्रस्तूत अध्ययनामुळे लोकसाहित्य, लोककलावंत, लोकसंस्कृती व लोकजिवनाचा अभ्यास शास्त्रिय पद्धतीने करता येऊ शकतो हा आत्मविश्वास जागृत झाला. लोकनाट्य जीवंत ठेवायचे असेल तर लोकसाहित्य, लोकसंस्कृती आणि लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या जिवनाचा अभ्यास करुन समाजाच्या लोककलेविषयी आवडी-निवडी, समाजात आलेले परिवर्तन इ. बाबींचा विचार व अध्ययन करता आले या अध्ययनामुळे लोककलावतांच्या समस्या व त्यावर उपाययोजना सुचविता आल्या.

प्रस्तूत अध्ययनाने दुरदर्शन व चित्रपट या माध्यमांचा लोकनाट्यांवर व प्रेक्षकांवर प्रचंड प्रभाव पडला आहे, हे लोककलावंताच्या मुलाखतीतून समजून आले. त्याच प्रमाणे अत्याधुनिक मनोरंजनाची साधने जसे मोबाईल व्हाट्सॲप, यु-टयुब, क्लिप्स, ओटीटी प्लॅटफॉर्म या माध्यमांनी खडीगंमत पाहण्याकडे प्रेक्षकांचा ओढा कमी झाला आहे.

परिणामी 'खडीगंमत' प्रेक्षकशरण झाली. प्रेक्षकांच्या अभिरूचीप्रमाणे खडीगंमत या लोकनाट्याचे स्वरूप बदलत चालले आहे. तरीही या लोकनाट्याकडे प्रेक्षकांनी पाठ फिरविली असल्याचे दिसून येते. त्यामुळे लोकनाट्यातील गरीब कलावंतावर उपासमारीची पाळी आली असल्याचे स्पष्ट दिसून येते.

खडीगंमत ही केवळ मनोरंजनप्रधान कला असली तरी अलीकडील भूतकाळात 'सत्यशोधक तमाशा' आणि 'आंबेडकरी जलसा' या रूपाने खडीगंमतीचा बाज स्विकारुन लोककलावंतानी सामाजिक बांधीलकिच्या चळवळी उभ्या केल्या. महात्मा फुलेच्या विचारांनी प्रेरित होऊन जलसाकारांनी सत्यशोधकी जलशातून धार्मिक गुलामगिरीची बंधने झुगारूण अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, अनिष्ठ परंपरांना मुठमाती दिली. हे विसरून चालणार नाही याचीही जाणिव या अध्ययनातून निर्माण झाली.

अशाप्रकारे सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीय प्रबोधनातून लोकरंजन करणारी 'लोककला खडीगंमत' अलिकडे लोप पावत चालली आहे. लोकाश्रय जवळ जवळ संपलेला आहे. त्यामुळे या लोकनाट्याच अस्तित्व धोक्यात आले आहे. कलावंतांना तुटपूंज्या बिदागीवर जगणे कठिण झाले आहे. परिणामी या लोकनाट्यातील काही कलावंत भजन-किर्तन, व कव्वालीकडे आकर्षित झाले आहेत.

विदर्भातील खडीगंमत मधील मराठी मनावर अधिराज्य गाजवणारी 'लावणी' या प्रकाराला मराठी सिनेमात तमाशाप्रधान विषयाचे पीक आले आहे त्यात 'मराठी मनाची राणी' असलेली लावणी मुळ स्वरूपासह बदललेली दिसते. अशा लावण्या शहरी प्रेक्षकांना आकर्षित करतात व नाट्यगृह हाऊसफुल होतांना दिसतात.

दुसऱ्याच प्रकारचे नृत्य-कलावंत लावणीत घुसल्यामुळे खऱ्या लोकलावंतांच्या पोटावर पाय पडला आहे. याकडे समाजाने व सरकारने दुर्लक्ष करुन चालनार नाही. लावणीचे मुळ स्वरूप व तिचा बाज जपला पाहिजे. असे लोककलावंत बोलुन जातात. 'फिल्मी लावणी' व 'डान्स हंगामा' हे प्रकार अलिकडे लोकनाट्य म्हणून खपविले जाते. या कार्यक्रमाला प्रेक्षकांची अलोट गर्दी दिसून येते तर लोकनाट्याला प्रेक्षक मिळत नाही.

खडीगंमतमधील पारंपारिक लावणी व सिनेमातील व्यावसायिक लावणी यांची तुलना होऊच शकत नाही व ती कोणी करुही नये असे खडीगंमतचे कलावंत आत्मविश्वासाने सांगतात. विदर्भातील लोकप्रिय खडीगंमत ही लोककला टिकवून ठेवण्यासाठी सरकारने विशेष मानधन योजना राबवून लोककलावंताना आर्थिक स्थैर्य मिळवून दयावे. तसेच शासनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये खडीगंमत या लोकनाट्याला प्राधान्य दयायला हवे.

तरुण कलावंताना या कलेची आवड निर्माण करण्यासाठी प्रत्येक मोठया गावात सांस्कृतिक केंद्राच्या माध्यमातून खडीगंमत प्रशिक्षणाचे वर्ग सुरु करावे. आणि कलावंताना ज्येष्ठ शाहिरांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन दयावे.

आधुनिक प्रसार माध्यमाचा वापर करुन ही लोककला जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी युटयूब, इन्स्टाग्राम, फेसबुक, इ. माध्यमातून प्रसारित करावी. लोककलावंताना प्रोत्साहित करण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर खडीगंमत महोत्सवाचे नियमित आयोजन करुन त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून दयावे.

खडीगंमतमधील पारंपारिक साहित्याचे लिखित किंवा व्हिडीओ दस्तऐवजीकरण करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा हे दुर्मिळ अलिखित साहित्य नव्या पिढीतील कलावंतांना उपयोगी पडणार नाही. व या दुर्मिळ लोकप्रिय लोकनाट्याचे अस्तित्व धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. हे प्रस्तूत अध्ययनातून समजून आले.

**निष्कर्ष :**

१) खडीगंमत हा प्राचिन लोकनाट्याचा प्रकार आहे.
२) खडीगंमत या लोकनाट्यातून सामाजिक प्रबोधन व मनोरंजन होत असते.
३) खडीगंमत ही ग्रामिण विभागातील मनोरंजनाचा लोकप्रिय प्रकार आहे.
४) हे लोकनाट्य महाराष्ट्रातील विदर्भातील वैशिष्ट्यपूर्ण लोककला आहे.
५) खडीगंमत ही लोककला हळूहळू लोप पावत आहे.
६) या कलेतील कलावंताची आर्थिक व सामाजिक परिस्थिती दयनिय आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**

१) बोरकर, हरिश्चंद्र : खडीगंमत विदर्भाचे लोकलेणे, तारा प्रकाशन, साकोली, भंडारा ऑगस्ट, २००८
२) ढेरे, रा. ची : भारतीय रंगभूमीच्या शोधात पद्मगंधा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, पुणर्मुद्रण २१ जुलै २०१४
३) व्हटकर, नामदेव : मराठीचे लोकनाट्य तमाशा कला आणि साहित्य, जयश्री प्रकाशन जवाहर नगर कोल्हापूर प्र. आ. १९७५
४) जांभुळकर काशिनाथ : महाराष्ट्राचे लोकनाट्य उगम व विकास मंगेश प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर ४४००१०
५) भंडारे, संदेश : तमाशा एक रांगडीगंमत, प्रकाशन विश्वासराव लोकवाङ्मय गृह, सयामी रोड मुंबई
६) लांजे, हिरामन : खडीगंमत प्रकाशक, द.म.क्षे.सा. केंद्र नागपूर
७) जाखडे, अरुण : पद्मगंधा दिवाळी अंक २०२४ पद्मगंधा प्रकाशन पूणे
८) व्यवहारे शरद : लोकसंस्कृतीचा अंतःप्रवाह, प्रतिमा प्रकाशन, सदाशिवपेठ पुणे, प्र. आ. जुन १९९९
९) काळभुत पु.मा : लोकनाट्य उद्गम आणि विकास विजय प्रकाशन, नागपूर प्र. आ. १९९७
१०) मांडे, प्रभाकर : लोकरंगभूमी, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. १९९६

https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P054
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

११) लांजे हिरामन : महाराष्ट्राची लोकनृत्य नाट्यधारा विवेक प्रकाशन, शिवाजी नगर नागपूर प्र.आ. ऑक्टो. २०००
१२) भगत दत्ता : मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास प्रकाशक म.रा.सा. आणि संस्कृती मंडळ मुंबई प्र.आ.२०१९
१३) नंदनवार मधुकर (संपा) : दशा आणि दिशा, प्रकाशक सर साहित्य केंद्र हुडकेश्वर रोड, नागपूर, प्र. आ. ४४००३४